# महाराष्ट्र शासन

स्थानिक निधी लेखा संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई.

☎ /🖷 :- 022,27571391. E.Mail:- calfak6@yahoo.com

दिनांक :- 30/6/2009

कार्यालयीन आदेश क्रमांक 36 दिनांक

महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखा परीक्षा) नियम, १९६१ महाराष्ट्र शासन असाधारण अधिसूचना क्र.व्ही.पी.ए. ११६० -पी, दि. २७ एप्रिल १९६१ असाधारण अधिसुचना क्र.व्ही.पी.ए.११६४/६०९९८२ पी, दि.१९ ऑक्टोंबर १९६४ , क्र.व्ही.पी.ए.११६४/१०७६ पी, दि.१७ जानेवारी १९६७ व क्र.लेखासं २००२/प्र.क्र.४३/वित्त-४ (२४-अ), दि.३१ मे २००४ ने सुधारणा केल्याप्रमाणे अंमलात आहेत. त्यानुसार लेखापरीक्षण करण्याकरीता पंचायतींचे वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात आले आहे.

| | पंचायत वर्ग | उत्पन्न रुपये | लेखापरीक्षक |
|---|---|---|---|
| १) | गौण पंचायती | २५,००० पर्यंत | * अधिनियम, १९५८ च्या कलम १४० नुसार विहित प्राधिकारी (जि.प.) |
| २) | प्रधान पंचायती | २५,००० चे वर | मुख्य लेखापरीक्षक,स्थानिक निधी लेखा संचालनालयाने नियत केलेले लेखापरीक्षक |

* यात महाराष्ट्र अधिनियम क्र.१३ सन १९७५ व अधिनियिम क्र.२० सन १९७५ नुसार केलेल्या सुधारणा अनुक्रमे दि.१ ऑक्टोंबर १९७५ व दि. ४ मे २००५ पासून अंमलात आल्यात. त्यानुसार रु. १०,००० पर्यंत ग्राम सभेला व रु. १०,००० चे वर परंतु रु.२५,००० पर्यंतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी द्वारा प्राधिकृत विस्तार अधिकाऱ्याला लेखापरीक्षणाचे अधिकार देण्यांत आले आहेत. या लेखापरीक्षणाची स्थिती जाणून वेवून पंचायत राज समितीच्या निदर्शनास आणण्यासाठी जिल्हा परिषद/ पंचायत समितीकडून ही माहिती संकलीत करणे आवश्यक आहे. त्यात खालील नमुन्यात विवरण मागविण्यात यावे व दरवर्षी याच नमुन्यात विवरण सन २००८-२००९ वर्षातील घट/ वाढ विचारात घेवून दि.३० जून पूर्वी सादर करण्याविषयी जिल्हा परिषद/ पंचायत समितीकडून मागविण्यात यावे. त्यावरुन स्थानिक निधी लेखा विभागाला गौण ग्रामपंचायती व्यतिरिक्त प्रधान ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण वर्षातील वार्षिक लेखापरीक्षण कार्यक्रम आयोजित करणे शक्य होईल.

## नमुना

जिल्हा-------------------- तालुका------------- पंचायत समिती----------------

गौण ग्रामपंचायतीच्या प्रलंबित लेखपरीक्षणाबाबतची माहिती.

| वर्ष | प्रलंबित | निपटारा केलेले घटक | शिल्लक |
|---|---|---|---|
| सन २००७-२००८ | रु.१०,००० पर्यंत<br>रु.१०,००० ते २४,९९९ | | |
| सन २००८-२००९ | रु.१०,००० पर्यंत<br>रु.१०,००० ते २४,९९९ | | |
| एकूण | | | |

२) महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरीक्षा) नियम १९६१ च्या नियम ३ नुसार लेखापरीक्षण करताना नियम ०/० मध्ये दिलेल्या सर्व मुद्यांचा प्रतिवृत्तांत समावेश असला पाहिजे व असे प्रतिवृत्त नियम १८ मध्ये विहित के...्या प्रमाणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम ४५ मध्ये विहित अनुसूची १ कलम ५७ मधील ग्रामनिधी महाराष्ट्र ग्रामपंचायत (कर व फी) नियम १९६० मधील तसेच अन्य कलम/नियमाखालील जमाखर्चाबद्दलच्या तरतुदी विचारात घेण्यात याव्यात. या नियमाच्या नियम ८ मधील तरतुदीनुसार नियम १९ व २० प्रमाणे प्रतिवृत्ते निर्गमित करण्यात यावीत. यात हयगय, दुर्लक्ष्य इ. बाबी निदर्शनास आल्यास संबंधित लेखापरीक्षकांवर कडक कार्यवाही करण्यात येईल.

३) उपरोक्त प्रतिवृत्तात शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. व्हीपीएम २६९९/ प्र.क्र.२०६(१)/२१, दिनांक २१ जानेवारी २००० मध्ये नियत केल्याप्रमाणे कर्मचाऱ्यांचा आकृतीबंधाबाबत समालोचन करण्यात यावे.

४) महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरीक्षा) नियम, १९६१ च्या नियम १६ प्रमाणे पंचायतीकडील रोख शि...क रकमा इ.ची पडताळणी स्थानिक निधी लेखा विभागाने करण्याचे अभिप्रेत नाही. त्यामुळे अशी पडताळणी करु नये.

५) ग्रामपंचायत लेखापरीक्षा अहवालाचा नमुना यासह जोडला आहे. त्याप्रमाणे अहवाल असावा.

हे आदेश निर्गमित झाल्याचे दिनांकापासून अंमलात येतील.

(माणिक कौरथी),
मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य.

योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) सहमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
२) उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, सर्व सह.मु.ले.प. यांचेमार्फत
३) जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, सर्व सह.मु.ले.प. यांचेमार्फत त्यांनी उपरोक्त आदेश सर्व लेखापरीक्षकांच्या निदर्शनास आणन कार्यवाहीवर लक्ष ठेवावे.

VP

३२८

# ग्रामपंचायत तालुका जिल्हा
# यांचे लेख्यावरील लेखारीक्षण अहवाल नमुना

ग्रामपंचायत तालुका जिल्हा

येथील सन ते या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण ग्रामपंचायत अधिनियम कलम १४० (१) नुसार व मुंबई ग्रामपंचायत हिशोब तपासणी नियम १९६१ नियम १७ व १८ अन्वये

(१) श्री. पदनाम

(२)

(३)

या पथकाने दिनांक ते दिनांक या कालावधीत पूर्ण केले आहे.

१. ग्रामसेवक या पदावर खालील कर्मचा-यांनी कार्यभार साभाळला आहे.

| अ.क्र. | नांव | कालावधी |
|---|---|---|
| | | |

२. खालील व्यक्तींनी सरपंच या पदाचा कार्यभार सांभाळला आहे.

| अ.क्र. | नांव | कालावधी |
|---|---|---|
| | | |

३. खालील व्यक्तींनी उपसरपंच या पदाचा कार्यभार सांभाळला आहे.

| अ.क्र. | नांव | कालावधी |
|---|---|---|
| | | |

४. विहित (१) व (२) मध्ये जमा / खर्च (मुंबई ग्रामपंचायत अंदाजपत्रक व हिशेब नियम १९५९ नमुना ३ व ४ प्रमाणे )

| अ.क्र. | निधी / योजना | २००४-२००५ | | २००५-२००६ | | २००६-२००७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जमा | खर्च | जमा | खर्च | जमा | खर्च |
| १ | ग्रामनिधी<br>इतर ग्रा.योजना<br>------------योजना<br>------------योजना | | | | | | |

टीपः- नमुना ३ मधील बाब १९ व नमुना ४ मधील बाब ३१ ची बेरीज सारखी असावी.

## भाग-१ मागील तपासणी

मागील लेखापरीक्षा सन ते अखेर करण्यात आली असून लेखापरीक्षणाचा अहवाल जा.क्र. दिनांक ने ग्रामपंचायतीला पाठविण्यात आला आहे.

ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवालातील आक्षेप पूर्तता स्विकृतीचे अधिकार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम १४० (२) अन्वये उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांस असल्याने ही अद्ययावत माहिती लेखापरीक्षणाकडे उपलब्ध नाही.

(अहवालातील मागील प्रत्येक वर्षाच्या निकालात व काढलेल्या आक्षेपांची परिस्थिती जोडावी.)

## भाग-२ चालू लेखापरीक्षण

प्रास्ताविक:- (१) ग्रामपंचायतीच्या आर्थिक परिस्थितीबाबत संक्षिप्त अभिप्राय देण्यात यावेत. तिची मालमत्ता व दायित्वे चे विवरणपत्र अहवालासोबत जोडण्यात यावे. पहा नियम १८ (ब) परिच्छेद अ प्रमाणे

(२) वर्ष अखेरीस असलेली कर थकबाकी दर्शविणारे विवरणपत्र (परिच्छेद ब) नियम १८ (ब) प्रमाणे [illegible] यावे. हा लेखापरीक्षण अहवाल ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधी व वर नमूद केलेल्या विविध योजनामधील आर्थिक व्यवहारा[illegible] तपासणीअंती तयार करण्यात आला आहे. त्यात ग्रामनिधी व इतर ग्रामीण योजना योजना यांचे विभागवार आक्षेप दोन भागात नमूद केले आहेत. त्यांचा एकत्रित गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | कायद्याविरुध्द प्रदान, व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणूकीमुळे होणारी तुट किंवा हानी व हिशोबात न घेतलेल्या रकमा या प्रकारच्या गंभीर अनियमितता. | परिच्छेद क्रमांक |
| ब) | उपरोक्त अनियमितता वगळता हिशोबात आढळून आलेल्या इतर महत्त्वाच्या अनियमितता | परिच्छेद क्रमांक |
| क) | उपरोक्त `अ` व `ब` मधील अनियमितता वगळता इतर आवश्यक मुद्दे | परिच्छेद क्रमांक |

१ **ग्रामनिधी**

अ) कायद्याविरुध्द प्रदान, व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणूकीमुळे होणारी तुट किंवा हानी हिशोबात न घेतलेल्या रकमा या प्रकारच्या गंभीर अनियमितता.

परिच्छेद क्रमांक १

परिच्छेद क्रमांक २

ब) उपरोक्त अनियमितता वगळता हिशोबात आढळून आलेल्या इतर महत्त्वाच्या अनियमितता.

परिच्छेद क्रमांक ३

परिच्छेद क्रमांक ४

परिच्छेद क्रमांक ५

क) उपरोक्त `अ` व `ब` मधील अनियमितता वगळता इतर अनियमितता.

परिच्छेद क्रमांक ६

परिच्छेद क्रमांक ७

२ **इतर ग्रामीण योजना (योजना निहाय)**

अ) कायद्याविरुध्द प्रदान, व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणूकीमुळे होणारी तुट किंवा हानी हिशोबात न घेतलेल्या रकमा या प्रकारच्या गंभीर अनियमितता.

परिच्छेद क्रमांक ८

ब) उपरोक्त अनियमितता वगळता हिशोबात आढळून आलेल्या इतर महत्त्वाच्या अनियमितता.

परिच्छेद क्रमांक ९

परिच्छेद क्रमांक १०

क) उपरोक्त `अ` व `ब` मधील अनियमितता वगळता इतर आवश्यक मुद्दे

परिच्छेद क्रमांक ११

३ **शासन आदेश ग्रामीण विकास विभाग क्रमांक ग्रापंप्र-१०८९ / ५४ / प्र.क्र.१०५२, दिनांक १८ नोव्हेंबर १९८९ नुसार ग्रामपंचायतींनी त्यांच्या उत्पन्नातील १५% भाग मागास वर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च केला किंवा कसे? याबाबत अभिप्राय नोंदवावेत.**

(याप्रमाणे इतर योजनांचे आक्षेप या खाली नमूद करण्यात यावेत.)

(अहवालाच्या शेवटी हिशोबाच्या एकूण स्थितीबाबत मत व्यक्त करण्यात यावे.)

वार्षिक हिशोबाच्या बिनचुकपणाबाबत प्रमाणपत्र देण्यात यावे. [पहा नियम १८(ग)]

## परिशिष्ट (अ)

आर्थिक स्थिती:- दिनांक ३१/३/

१) पंचायतीची दायित्व व मालमत्ता दर्शविणारी स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| दायित्व | रक्कम | मालमत्ता | रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |
| एकूण | | एकूण | |

पंचायतीच्या दायित्वापेक्षा मालमत्ता / मालमत्तेपेक्षा दायित्व रुपये ने जास्त आहे.

## परिशिष्ट (ब)

वर्ष अखेरीस असलेली कर थकबाकी दर्शविणारे विवरणपत्र.